# घटक ४ : (ब) स्त्री-मुक्ती चळवळीची गरज

## अनुक्रमणिका


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्तविक

४.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि टिपा.

४.३ उताऱ्याचे अध्ययन

- ४.३.१ पहिल्या भागाचे वाचन व मुद्दे
- ४.३.२ स्त्रीची बदलती भूमिका.
- ४.३.३ स्त्री विषयक पारंपरिक दृष्टिकोण व आधुनिक दृष्टिकोण.
- ४.३.४ स्त्रीमुक्ती चळवळ व समाजवादी समाजव्यवस्था.
- ४.३.५ कामगार स्त्रिया
- ४.३.६ शेतमजूर स्त्रिया.
- ४.३.७ दुसऱ्या भागाचे वाचन व मुद्दे
- ४.३.८ मध्यमवर्गीय स्त्रियांचे प्रश्न
- ४.३.९ स्त्रियांच्या विकासाचे कार्यक्रम

४.४ नमुना उत्तरे

४.५ अधिक अध्ययन

- ४.५.१ वेचक विचार
- ४.५.२ लेखिका परिचय

४.६ सारांश

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्टे

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजवर दडपले गेलेले जे सामाजिक गट आहेत ते जागृत झाले आहेत. स्त्रिया आपल्या भूमिकांच्या विषयी नव्याने विचार करीत आहेत. भारतात स्त्री मुक्ती चळवळ मूळ धरू लागती आहे या चळवळीच्या संदर्भात काही विचार श्रीमती छाया दातार यांनी मांडले आहेत. या घटकाचा अभ्यास केल्यावर तुम्हांला

* स्त्रीला माणूस म्हणून प्रतिष्ठा मिळाली पाहिजे हे समजून घेता येईल.
* स्त्री-मुक्ती चळवळीची गरज स्पष्ट करता येईल.
* स्त्री कडे पाहण्याचे पारपरिक आणि आधुनिक दृष्टिकोण यांतील भेद स्पष्ट होईल.
* स्त्री मुक्तीसाठी समाजवादी समाजव्यवस्थेची निर्मिती केली पाहिजे हा विचार लक्षात येईल.
* या उताऱ्याची भाषिक वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील.

## ४.१ प्रास्ताविक

(१) स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत स्त्री– पुरुषांना समान हक्क आहेत. स्त्रीला दुय्यम नागरिकत्व दिलेले नाही. स्त्रीच्या विकासाला दाही दिशा मोकळया आहेत.

(२) पण वर्षानुवर्षे स्त्रीकडे भोग्यवस्तू म्हणून पाहण्याचा परंपरागत बुरसट दृष्टिकोण या देशात रूजलेला आहे. स्त्रीही माणूस आहे,तिला जसं शरीर आहे तस तिला मन आहे ही नवी दृष्टी आता रूजली पाहिजे. घटनेने तिला स्वातंत्र्य मिळाले तरी वस्तुस्थिती अशी आहे की ती दास्यत्व भोगते आहे. स्त्रीचे कार्यक्षेत्र 'चूल आणि मूल' हेच आहे असे परंपरागत,सनातन संस्कृतीचे अभिमानी मानतात. विकासासाठी तिला दाही दिशा मोकळया ठेवण्याऐवजी परंपरेने तिच्यासमोर अनेक लक्ष्मणरेषा ओढल्या आहेत. म्हणजे खऱ्या अर्थाने स्त्री मुक्त नाही.

(३) भारतात स्वातंत्र्याच्या उदया बरोबर गुलामीचे जिणे कंठणाऱ्या वंचित,दलित जातीजमाती,विमुक्त भटक्या जमाती, आदिवासी,गिरीजन आणि सर्व स्तरांतील स्त्रिया निर्धारपूर्वक सांगत आहेत की आम्ही माणूस आहोत आणि माणूस म्हणून प्रतिष्ठेने जगणार .

(४) आज जगभर स्त्रीच्या मनावर लादलेली सामाजिक - धार्मिक - सांस्कृतिक दडपण दूर करून तिला मुक्त करण्यासाठी चळवळी चालू आहेत. भारतातही स्त्री-मुक्ती चळवळीची गरज आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्री आपले कर्तृत्व गाजवीत आहे. लैंगिक भेदावर आधारित श्रमविभागणी नष्ट झाली पाहिजे ही तिची मागणी आहे. एकजुट करून सम्यक परिवर्तनासाठी ती सिध्द होऊ लागली आहे. स्त्रीला मुक्तीसाठी लढा उभा करावा लागला आहे.

## ४.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि टिपा.

बेगडी - दिखाऊ
कर्मचारी - कामगार
शोषण करणे - गैरफायदा घेणे, पिळवणूक करणे
मूल्य - किंमत
वेतन - पगार
ट्रेनिंग - प्रशिक्षण
ताबा घेणे - मालकीचे करणे,
उफराटी - उलटी
वैतागणे - रागावणे, संतापणे
देखभाल करणे - काळजी घेणे
मरमर काम करणे - खूप काम करणे
बुद्दू - मूर्ख
साखळया तोडणे - मुक्त होणे
गेट - फाटक

## ४.३ उताऱ्याचे अध्ययन

### ४.३.१ पहिल्या भागाचे वाचन, मनन व मुद्दे.

आपण हे मान्य करू या की, लैंगिक भेदावर आधारित श्रमविभागणी नष्ट झाली पाहिजे. पुरुषांचे काम पैसे मिळविणे व स्त्रीचे काम 'चूल आणि मूल' हे नष्ट झाले पाहिजे. या मार्ग मधील अडथळा ही भांडवलशाही समाजव्यवस्था आहे समाजव्यवस्था बदलून समाजवादी समाजव्यवस्था आली तरच स्त्री-मुक्तीसाठी आवश्यक वातावरण तयार होऊन तिला शिक्षण मिळेल, काम मिळेल आणि

मग तिच्या मनावरची सांस्कृतिक दडपणे हळू हळू कमी होतील व ती एक समाजाची स्वतंत्र नागरिक म्हणून आर्थिक व राजकीय व्यवहारांमध्ये पुरुषाच्या बरोबरीने भाग घेऊ शकेल. आज स्त्रीसुलभ मानल्या जाणाऱ्या नोकऱ्या न करता आपल्या आवडीचा कोणताही व्यवसाय ती निवडेल आणि खऱ्या अर्थाने मुक्त, स्वतंत्र व्यक्ती म्हणून समाजात वावरेल. नित्य नवीन लाभणारे तांत्रिक शोध तिला तिच्या रोजच्या जबाबदारीतून अधिकाधिक मुक्त करीत जातील.

स्त्री-मुक्ती चळवळीची गरज.

पण हे सगळे कसे साधायचे ? हा बदल कसा घडवून आणायचा ? एक तर आपण सगळेच जाणतो. आजचे जीवन इतके सामूहिक बनलेले आहे की आपण एकेकटयाने कोणतीच गोष्ट साध्य करू शकणार नाही. त्यासाठी एकजुटीची आवश्यकता आहे. सर्व स्त्रियांनी एकत्र आले पाहिजे. एकजूट हीच आपली शक्ती आहे. ही शक्ती आपणांस सरंजामशाहीविरूद्ध, भांडवलशाहीविरूद्ध आणि त्यांनी निर्माण केलेल्या बेगडी संस्कृतीविरूद्ध वापरायची आहे. यासाठी कामगार-स्त्रिया, शेतमजूर व गरीब शेतकरी स्त्रियां, मध्यमवर्गीय कर्मचारी स्त्रिया या तिन्ही वर्गातील गृहिणी व या तिन्ही वर्गातील विधार्थिनी व त्याचबरोबर मध्यम शेतकऱ्यांचा बायका या चारही गटांच्या स्त्रियांची एकजूट होणे आवश्यक आहे.

कामगार स्त्री : मुख्य म्हणजे इतर अनेक कामगार पुरुषांप्रमाणे भांडवलदार हिचे शोषण करत असतो. हिची श्रमशक्ती भांडवलदार विकत घेतो. तिच्याकडून यंत्रावर काम करवून घेऊन कच्च्या मालाचे रूपांतर पक्क्या मालात करवून घेतो. तिची आठ तासांची श्रमशक्ती कच्च्या मालात जाते. बाजारात तो पक्का माल विकून पूर्वीच्या पेक्षा मालकाला जास्त मूल्य मिळते. या जास्त मिळालेल्या मूल्यांपैकी थोडासा भाग जीवनावश्यक वेतन म्हणून कामगार स्त्रीला मिळतो. बाकीचा भाग नफा म्हणून भांडवलदारांच्या खिशात जातो.

कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर झाल्यावर त्यांची किंमत का वाढते ? कारण त्यामध्ये कामगाराचे श्रम जात असतात. ही किंमत त्या श्रमांची किंमत असते. मालक जेव्हा कामगाराला जीवनावश्यक वेतन देतो तेव्हा तो त्याला संपूर्ण श्रमांची किंमत देत नाही तर काही भागाची किंमत देतो. बाकीच्या भागाला आपण नफा म्हणतो. नफा म्हणजेच कामगाराचे शोषण केलेले श्रम.

याखेरीज या कामगार-स्त्रीला दोन पाळ्या कराव्या लागतात. कारखान्यातील एक पाळी व घरगुती कामांची दुसरी पाळी. शिवाय या कामगार-स्त्रियांसाठी अनेक कायदे होऊन,सुद्धा तिला त्यांचा फारसा फायदा मिळू शकत नाही. लग्न झाले की कामावरून काढूनही टाकण्यात येते. मुलांसाठी शिशुकेन्द्रे मिळत नाहीत. बाळंतपणाचा खर्च अतिशय थोडा मिळतो. कौशल्य वाढविण्यासाठी, ट्रेनिंगला जाण्यासाठी सवलत मिळत नाही.

कामगार-स्त्रिया या सर्वात पिळल्या गेलेल्या स्त्रिया आहेत. त्यांना सामुहिकपणे यंत्रावर काम करण्याची सवय झाली आहे. त्यातूनच त्यांची सामूहिक जाणीव वाढली आहे. आपण सर्व मिळून यंत्रांवर काम करतो. आपण सर्व मिळून यंत्रावर ताबा घेऊ, कारखान्यावर ताबा घेऊ व सर्व कारखाने समाजाच्या मालकीचे करू, अशी जागृती त्यांच्या मनात हळूहळू तयार होते. म्हणून त्यांना आपण आघाडीच्या स्त्रिया म्हणू. समाजवादामुळेचच मालक व मजुर संबंध संपणार आहेत व समाजवादी व्यवस्थेमध्येच सर्व पिळल्या गेलेल्या वर्गाची मुक्ती आहे, ही वर्गजाणीव त्यांना त्यांच्या लढयातून येत असते. मूठभरांची मालकी व सामुदायिक श्रम ही उत्पादनव्यवस्था आणली पाहिजे तरच आपल्याला मानव म्हणून जगता येईल, सवलती मिळतील, सोयी मिळतील हे त्या अनुभवातून शिकतात. संप, मोर्चे, बंद या प्रकारच्या लढयातून तिला शिक्षण मिळत जाते व ती अधिकाधिक जागृत होत जाते. हेच राजकारण घेऊन कामगार-स्त्रियांनी इतर स्त्रियांकडे गेले पाहिजे. क्रांतिकारी-समाजवादी राजकरणाचा आदर्श घालून दिला पाहिजे.

कामगार-स्त्रियांसारखीच स्थिती आज शेतमजूर व गरीब शेतकरी स्त्रीची आहे.किंबहुना त्याहूनही वाईट आहे. ती श्रीमंत शेतकऱ्यांच्या शेतावर काम करायला जाते. तेथे तिला मजुरीचा दर अत्यंत कमी मिळतो. तिच्या श्रमांची चोरी होते. पुरुषाच्या बरोबरीने काम करून ही तिला १ रुपया रोज किंवा दीड रुपया रोज मिळतो. वर्षाकाठी जेमतेम १०० दिवस काम मिळते. बाळंतपणाचा खर्च मिळत नाही की सुट्टी मिळत नाही किंवा मुलांना सांभाळण्यासाठी शिशुकेंन्द्र चालविले जात नाही. तिच्यासाठी असे कायदे सुद्धा झाले नाहीत. एकटेदुकटे दूरवर रानात काम करावे लागते. त्या वेळी कोणतेही संरक्षण मिळत नाही.

शेतातील काम व घरगुती काम — दोन पाळ्या तिच्याही नशिबी आहेतच. दारू पिऊन आलेल्या नवऱ्याचा मार तिलाही खावा लागतो. मुलाला टोपलीत घालून कामाला जावे लागते. तेथे दोन मिनिटे दूध पाजायला बाजुला बसले तर मालक ओरडतो. शिक्षण नाही. अडाणीपणा, अंधश्रद्धा यामुळे ती अधिकच पिचली जाते. मात्र या स्त्रियांना कामगार-स्त्रियांसारखी सामूहिक मालकीची जाणीव एकदम येऊ शकत नाही. यंत्रावर एकत्र काम करून कामगार स्त्रीला सामूहिक कामाचे महत्त्व पटते. तसेच आधुनिक यंत्रांचा परिचय होतो. बदलत्या जगाचे भान येते. शेतावर काम करणारी शेतमजूर-स्त्रीही हा बदल बघत असते. नांगराच्या बदल्यात ट्रॅक्टर येतो. छोटया शेतकऱ्यांच्या जमिनी जातात; पण तिच्या मनातील आपल्या मालकीचे शेत असावे ही कल्पनाही पूर्णपणे गेलेली नसते. आता शेतमजूर-संघटना स्थापना होत आहेत व शेतमजुरांनाही संघटनेचे, सामूहिक कामाचे महत्त्व कळून येत आहे. आपली मजुरी वाढविण्यासाठी व आवश्यक सवलती मिळविण्यासाठी स्त्रियांनी या संघटनेत भाग घेतला पाहिजे. नेतृत्व पुरूषांच्या हाती सोपवून गप्प न राहता नेतृत्वासाठी पुढाकार घेतला पाहिजे व इतर स्त्रियांना संघटनेसाठी मार्गदर्शन केले पाहिजे. मानव म्हणून स्थान मिळवायचे असेल तर क्रांतीशिवाय पर्याय नाही, हे राजकरण शिकले पाहिजे.

हा उतारा वाचल्यावर खालील मुद्दे लक्षात येतात

(१) स्त्रीची 'चूल आणि मूल' ही भूमिका बदलली पाहिजे

(२) समाजवादी समाजव्यवस्था आली तर स्त्री-मुक्तीसाठी पोषक वातावरण तयार होईल.

(३) सर्व स्तरांतील स्त्रियांची एकजूट हवी.

(४) कामगार स्त्रिया शोषणा विरूध्द लढू लागल्या आहेत.

(५) शेतमजूर स्त्रियांना बदलत्या जगाचे भान आले तर त्यां संघटित होतील व आपल्या हक्कांसाठी लढू लागतील.

## ४.३.२ स्त्रीची बदलती भूमिका

स्त्री-मुक्ती चळवळीत प्रत्यक्ष काम करणाऱ्या एका कार्यकर्त्या स्त्रीचे मनोगत या उताऱ्यात व्यक्त झाले आहे. स्त्रीला केवळ देह नाही तिला मन आहे ही नवी जाणीव रूजत आहे. त्यामुळे स्त्रीला समाजात माणूस म्हणून प्रतिष्ठेने जगता आले पाहिजे या विषयी दुमत नाही. भारतीय राज्यघटनेने स्त्रीला पुरूषाबरोबरचे स्थान आणि हक्क दिले आहेत. स्त्री आणि पुरूष यांना समान वेतन दिले पाहिजे, जीवनाच्या सर्व क्षेत्रात विकासाची समानसंधी दिली पाहिजे अशी भूमिका स्वीकारून स्त्रियांच्या कल्याणासाठी अनेक कायदे शासनाने मंजूर केले आहेत. या कायद्यामुळे स्त्रियांच्या हक्काचे संरक्षण होईल. पुरूषांनी केवळ अर्थार्जन करावे आणि स्त्रीचे कार्यक्षेत्र चूल व मूल आहे या कल्पना आता टिकणार नाहीत. विचारवंत म्हणतात की उत्पादनव्यवस्था बदलल्या पण कुटुंबातील व समाजातील पुरूषी वर्चस्व मात्र कायम राहिले आहे. त्यामुळे तर स्त्रीच्या वाटयाला दुय्यम व विषम जीवन येते.

## ४.३.३ स्त्रीविषयक पारंपरिक दृष्टिकोण व आधुनिक दृष्टिकोण.

'एक कळसूत्री बाहुली' ही स्त्री विषयक कल्पना बदलणे आवश्यक होते. भारतीय संस्कृतीने स्त्री उपभोग्य वस्तू म्हणून न मानता अनंत काळची माता म्हणून तिचा गोरव केला आहे हेही मान्य करण्याचे कारण नाही.

| परंपरागत दृष्टिकोण | आधुनिक दृष्टिकोण |
| --- | --- |
| १ चूल व मूल हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र | १ स्त्रीच्या विकासाला अनेक कार्यक्षेत्रे |
| २ शिक्षणापासून वंचित राहिली तर बिघडले नाही | २ शिक्षण हे विकासाचे साधन आवश्यक |
| ३ दुष्ट, अनिष्ट रूढींच्या दास्यत्वात जखडलेली | ३ दुष्ट, अनिष्ट रूढीपासून मुक्तता |
| ४ जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य नाही | ४ जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य |
| ५ लग्नबंधन पारतंत्र्याचे द्योतक | ५ लग्नबधनातून इष्ट वाटेल तर मुक्त होण्याचे स्वातंत्र्य |
| ६ सर्व तऱ्हेचे परावलंबन | ६ आर्थिक स्वतंत्रता |

## ४.३.४ स्त्रीमुक्ती चळवळ व समाजवादी समाजव्यवस्था.

शोषणाधिष्ठित व विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेत स्त्री स्वतंत्र होऊ शकणार नाही भांडवलशाही व्यवस्थेत शोषण उपरिहार्य आहे. म्हणून भांडवलशाही समाजव्यवस्था स्त्रीला स्वातंत्र्य उपभोगू धायला असमर्थ आहे.

| भांडवलशाही समाजव्यवस्था | समाजवादी समाजव्यवस्था |
| --- | --- |
| (१) शोषणाधिष्ठित | (१) समताधिष्ठित, शोषणमुक्त |
| (२) उत्पादन साधने केवळ मूठभरांच्या मालकीची | (२) उत्पादन साधने समजाच्या मालकीची |
| (३) श्रमशक्ती भांडवलदार विकत घेतो | (३) श्रममूल्य व श्रमाला प्रतिष्ठा आहे |
| (४) नफा भांडवलदारांच्या खिशात | (४) नफ्याची समान वाटणी |
| (५) मालक - मजूर दास्य संबंध घट्ट | (५) मालक - मजूर दास्यसंबंध नष्ट |
| (६) विकास मूठभरांचा | (६) विकास प्रत्येकाचा |

### ४.३.५ कामगार स्त्रिया.

स्त्री-मुक्ती चळवळीची गरज.

आज उद्योगव्यवसायात लहान मोठया कारखान्यात स्त्रिया कामगार म्हणून काम करतात. एक काळ होताकी स्त्री-पुरुषांच्या वेतनात तफावत होती. कायद्याने तरी तफावत दूर केली आहे. या कामगार स्त्रिया संप, मोर्चे, बंद या प्रकारच्या लढयांतून शिक्षित होत आहे. त्या जागृत होत आहेत. मूठभरांची मालकी व कोटयावधींचे श्रम ही उफराटी तऱ्हा थांबवली पाहिजे म्हणून त्या लढयात उतरतात.

### ४.३.६ शेतमजूर स्त्रिया.

कामगार स्त्रियांच्या तुलनेत शेतमजूर स्त्रियांची स्थिती वाईट आहे. शेतातील काम व घरकाम यांचे ओझे तिच्या शिरावर आहे. शेतमालकाचा जुलुम सोसावा लागतो. तशात नवरा दारूबाज असला तर तिचे हाल कुत्रा खात नाही.
तिला शिक्षण नाही. अडाणीपणा, गरिबी, अंधश्रध्दा, खुळया समजुती यांच्या विळख्यात त्या सापडल्या आहेत.
शेतमजूरांच्या संघटना, शेती तंत्रातील नवे बदल इ.चे भान तिला येत आहे.
शेतमजूर स्त्रीला जागृत करून तिलाही अन्यायाविरूध्द लढा देण्यासाठी उभे केले पाहिजे.

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

(क) स्त्रियांची एकजूट कशासाठी हवी ?

१ ____________________

(२ ____________________

३ ____________________

४ ____________________

५ ____________________

ख) भांडवलदार स्त्रीचे शोषण कोणत्या प्रकारे करतो.

____________________

____________________

(ग) वाक्य पूर्ण करा.

१) एकजूट हीच ____________________

२) नफा म्हणजेच ____________________

३) समाजवादी क्रान्ती शिवाय ____________________

४) स्त्रियांना लढयांतून ____________________

(घ) आपल्या हक्कांसाठी लढताना कोणते मार्ग योजावे लागतात.

१ ____________________

२ ____________________

३ ____________________

४ ____________________

५ ____________________

६ ____________________

७ ____________________

८ ____________________

(ङ) स्त्रिया अर्थाजनासाठी विविध क्षेत्रात उतरत आहेत त्यामुळे शिक्षिका ग्रामसेविका इ.शब्द रूढ होत आहेत असेच आणखी शब्द सागां.

### ४.३.७ दुसऱ्या भागाचे वाचन, मनन व मुद्दे.

आज बँकांतून, खाजगी कंपन्यांतून, सरकारी कचेऱ्यांतून, हजारो स्त्रिया काम करतात. शिक्षिका, परिचारिका, ग्रामसेविका अशा अनेक व्यवसायांमध्ये स्त्रिया आहेत. त्यांनाही ऑफिसचे काम व घरचे काम अशा दोन पाळ्या असतातच. ऑफिसातून कायदे झाल्यामुळे बाळंतपणाची रजा मिळते. खर्च मिळतो. मात्र लहान मुलांना ठेवण्याची सोय अजूनही झालेली नाही. घरी नवरा फारसा मदत करीत नाही. सणवार वगैरे पूर्वीची कामे संपली नाहीत. घरात लक्ष देत नाही असे आरोप शेजारीपाजारी, नातेवाईक यांच्याकडून ऐकून घ्यावे लागतात. कामाच्या ठिकाणी बढतीची संधी मिळाली तरी पुष्कळदा घरच्या अडचणीमुळे बढती मिळविणे शक्य होत नाही.

याही स्त्रिया त्यांच्या कर्मचारी संघटनेच्या सभासद असतात. मात्र घरच्या काळजीमुळे त्या संघटनेच्या कामात फारसा भाग घेत नाहीत. संपाच्या दिवशी मोर्च्यात सामील होण्याच्या ऐवजी या स्त्रिया तेवढाच एक दिवस घरी मिळाला म्हणून घरची कामे काढतात. ऑफिस सुटल्यावर घरी जाण्याची त्यांना घाई असते. कामगार व शेतमजूर-स्त्रियांच्या मानाने या स्त्रियांमध्ये एकजुटीची भावना कमी असते. त्यांच्या मनावरचे सांस्कृतिक संस्कार अधिक प्रभावी असतात. उत्पादक कामामध्ये भाग घेत नसल्याने त्यांना आपली पिळवणूक कोणामुळे होते, कशी होते ते कळू शकत नाही त्या ब-याच व्यक्तिवादी राहतात. सामुहिक कामातून सामुहिक मालकी ही क्रांतिकारी जाणीव रूजू शकत नाही.

आपल्या दुःखाचे मूळ त्यांनी समजावून घेतले पाहिजे. प्रत्येक कर्मचारी स्त्री रोज तक्रार करते, चिडते, वैतागते; पण हे सर्व कशामुळे होते ? हे जर तिने डोळसपणाने पाहिले तर तिला कळून येईल की भांडवलशाही समाजव्यवस्था हा मार्गातील मोठा अडसर आहे. महागाई वाढते. नोकरी मिळायला अडचण पडते. नोकरी मिळाली तर सवलती मिळत नाहीत; सोयी नाहीत ऑफिसमध्ये साहेबाच्या हाताखाली दुय्यम दर्जाचे काम. हे सगळे संपवायचे असेल तर समाजवादाच्या लढयात भाग घ्यावाच लागेल. 'केवळ आतापुरता' विचार करून चालणार नाही; आता संघटनेत भाग घ्यायचा म्हणजे कष्ट अधिक पडतात. पण ते कष्ट कमी होतील की नाही ? मुले ही समाजाचीच मुले आहेत. त्यांच्या शिक्षणाची, लहानपणी सांभाळण्याची सोय समाजाने केली पाहिजे. कामाच्या ठिकाणी स्वस्त दरामध्ये अन्न देण्याची सोय करुन स्त्रियांचे श्रम समाजाने वाचविले पाहिजेत. तेव्हा याच मागण्या घेऊन त्यांनी संघटनेच्या अंतर्गत स्त्रीसंघटना उभी करून स्त्रियांमध्ये जागृती आणली पाहिजे. त्यातूनच त्या लढाऊ बनतील. यातूनच कुटुंबातील सांस्कृतिक बंधने तोडून टाकण्याची स्फूर्ती त्यांना मिळेल. नवरा, सासू, सासरा यांच्या दडपणाखाली राहण्याचे त्या नाकारू शकतील आणि यातून स्त्री-मुक्तीच्या सुयोग्य मार्गावरील त्यांची वाटचाल सुरू होईल.

भारतामध्ये एकूण स्त्रियांच्या लोकसंख्येपैकी काम करणाऱ्या स्त्रिया अतिशय थोडया आहेत. बाकी स्त्रियांचे काय ? कामगारांच्या बायका, मध्यम शेतकरी, पांढरपेशा कर्मचारी पुरूषांच्या बायका, शेतमजूर पुरुषांच्या बायका, शिवाय याच वर्गातील असंख्य विद्यार्थिनी, अविवाहित तरूणी यांची स्थिती आणखी वाईट आहे. या स्त्रियांना काम नाही. त्यामुळे आर्थिक स्वातंत्र्य अजिबात नाही. कामाच्या निमित्ताने बाहेर जायला मिळत नाही. घरात बसून भाकऱ्या भाजणे, मुलांची देखभाल करणे एवढेच काम. त्यांपैकी असंख्य स्त्रियांना शिक्षण नाही, वाचता येत नाही. ज्यांना शिक्षण आहे त्यांना दुपारी कादबऱ्या वाचीत बसण्याखेरीज दुसरा उद्योग नाही. त्यातही विधवा स्त्रियांना तर दुसऱ्याच्या आधारे राहावे लागते. घरात मरमर काम करून बोलणी खावी लागतात. गरिबाघरच्या तरूण मुलींची वडिलांची हुंडा द्यायची ऐपत नसल्याने लग्नं होत नाहीत. शिक्षणात फारशी प्रगती करता येत नाही. नोकरी मिळत नाही. सगळीकडून कुचंबणा होते.

या स्त्रिया कामाच्या ठिकाणी एकत्र येत नसल्याने यांची संघटना बांधणे आज कठीण होते. आपल्याला कशाशी आणि कोणाशी लढावयाचे आहे याची त्यांना कल्पना येऊ शकत नाही. हुंडा घेण्याची प्रथा का चालू राहते ? शिक्षण का मिळत नाही नोकरी का मिळत नाही महागाई कशामुळे होते या स्त्रियांनी या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हुंडा घेतला जातो, कारण या समाजात प्रतिष्ठा,पैसा याला महत्त्व मिळते. मुलगी दुसऱ्याच्या हातात सोपविण्याची कल्पना असते.

भांडवलशाही संस्कृती लग्नाला पण बाजारी स्वरूप आणते. शिक्षणासाठी या समाजात जास्त पैसा खर्च केला जात नाही. तो महागडया हॉटेलांसाठी खर्च होतो. परकीय भांडवलदारांच्या दबावाखाली येथील औद्योगिक प्रगती जोमाने होत नाही व नोकऱ्या निर्माण होऊ शकत नाहीत. साठेबाजीमुळे महागाई अधिक वाढते. हे सर्व समजून घेतले तर या सगळया गृहिणी आपल्या हक्कांसाठी झगडण्याकरता एकत्र येऊ शकतील. 'आम्हांला काम द्या' ही मागणी घेऊन त्यांना एकत्र येता येईल. 'प्रत्येक नागरिकाचा काम करण्याचा हक्क आहे.' याची जाणीव त्यांनी ठेवली पाहिजे.

स्त्रीचे लढाऊ रूप बघून स्त्री ही बुद्दू, असहाय्य, दुबळी अशी जी प्रतिमा पूर्वापार चालत आली आहे ती बदलेल. स्त्री अधिक निर्भय होईल. तिच्या आयुष्यात संघटनेला प्रथम महत्त्व येईल. स्त्री आंदोलनासाठी घरची इतर कामे मागे सारून पुढे येईल. घरदार, मुलेबाळे यांची जबाबदारी घेण्यासाठी तिच्या नवऱ्याला पुढे यावेच लागेल. स्त्री मानसिक गुलामगिरीतून मुक्त होऊ शकेल. आज गरज नुसतीच स्वातंत्र्याची नाही. मानसिक गुलामगिरी, सांस्कृतिक गुलामगिरी यांच्या साखळ्या तोडण्याचीही आहे आणि आर्थिक स्वातंत्र्याची झगडता झगडता तिला बंधने तोडण्याचे धैर्य येणार आहे. आज स्त्रिया अनेक संपांतून, मोर्च्यातून पुरूषांच्या बरोबरीने भाग घेताना दिसतात. गिरणी कामगारांच्या संपाच्या वेळी स्त्रिया जाऊन गेट अडवून धरत होत्या. रेल्वेसंपामध्ये स्त्रिया निदर्शनामध्ये सामील झाल्या होत्या. राज्यकर्मचारी संपामध्ये स्त्रियांनी रक्ताने आपल्या मागण्या लिहून पाठविल्या. एकमेकींच्या मुलांना संभाळण्याची जबाबदारी स्वीकारून स्त्रिया आज पुढे येत आहेत. एकजूट करीत आहेत. एवढेच नव्हे तर पुष्कळदा लढयामध्ये पुरूषांच्याही एक पाऊल पुढे राहात आहेत आणि त्यांना युगानुयुगांची बंधने तोडायची आहेत. उत्पादनामध्ये भाग घ्यायचा आहे. उत्पादनसाधने खूप प्रगत झाली आहेत आणि स्त्रियांच्या मुक्तीची शक्यता निर्माण झाली आहे. त्यांना मुक्त व्हायचे आहे आणि पुरुषालाही पुरुषी अहंकारातून मुक्त करायचे आहे. समाजवादी लढयाशिवाय ही मुक्ती शक्य नाही, याची त्यांना कल्पना आहे.

या उताऱ्यात खालील मुद्दे आहेत

स्त्री–मुक्ती चळवळींची गरज.

* कामगार - शेतमजूर स्त्रियांच्या तुलनेत मध्यमवर्गीय स्त्री कर्मचाऱ्यात एकजुटीची भावना कमी असते.
* त्यांच्या मनावर सांस्कृतिक संस्कार प्रभावी असतो. त्या व्यक्तीवादी असतात.
* आपल्या दुःखाचे मूळ कशात आहे ते मध्यमवर्गीय स्त्रीला समजावून दिले पाहिजे.
* स्त्रीला मानसिक व सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त केले पाहिजे.
* आर्थिक स्वातंत्र्य ही मुक्तीची पहिली पायरी

## ४.३.८ मध्यमवर्गीय स्त्रियांचे प्रश्न

आज शासकीय, निमशासकीय आणि अशासकीय कार्यालयातून उद्योगसमूहाच्या, बँकांच्या आणि अन्यत्र ठिकाणी बायका काम करीत आहेत. काही बायका अधिकारी, सचिव कुलगुरू, शास्त्रज्ञ, डॉक्टर, इंजिनिअर इत्यादी मानाच्या पदांवर काम करीत आहेत. त्यांना अर्थार्जनाबरोबर घराच्या जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतात. त्यांना बाळंतपणाच्या रजा व अन्य लाभ मिळतात.

या प्राधान्याने पांढरपेशा मध्यमवर्गीय स्त्रिया संघटनात रस घेत नाहीत. आपले काम बरे की आपण बरे ही वृत्ती. 'घर' सांभाळावे लागत असल्यामुळे त्यांना हक्कांसाठी उभारलेल्या लढयात फारसा भाग घेता येत नाही.

रोजगार करीत नसलेल्या स्त्रियांची संख्या सर्वाधिक आहे. त्यांना रिकामा वेळ खायला येतो. आम्हाला काम द्या असे म्हणण्याची पुष्कळांना गरज असतेच असे नाही. आर्थिक स्वातंत्र्य नसल्यामुळे परावलंबी, कोंडलेले जीवन जगावे लागते.

## ४.३.९ स्त्रियांच्या विकासाचे कार्यक्रम.

प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला वाव मिळेल अशी समाजवादी समाजव्यवस्था हवी. स्त्रीला जसे मानसिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त केले पाहिजे तसे पुरुषालाही पुरुषी अहंकारातून मुक्त करणे आवश्यक आहे. स्त्रियांच्या विकासासाठी भारत सरकारने खालील विकास कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत.

(१) स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे. 'निरक्षरता निर्मूलन' कार्यक्रम युध्द पातळीवर राबवला पाहिजे.
(२) स्त्रियांना रोजगार उपलब्ध करून द्यावा. त्यांच्या अंगचे तांत्रिक कौशल्य वाढवण्यासाठी प्रशिक्षण द्यावे.
(३) हुंडाबंदी, सतीबंदी इ. कल्याणकारी कायदे व त्यांची कठोर अम्मलबजावणी.
(४) वेगवेगळया क्षेत्रात स्त्रियांच्या संघटना हव्या. त्यामुळे स्त्रियांचे प्रश्न, त्यांच्या समोरील अडचणी दूर करता येतील.
(५) आरोग्य शिक्षण, दवाखाने इ. सोयी हव्यात.
(६) स्त्री निर्भय व सुशिक्षित झाली पाहिजे.
(७) आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग स्त्रियांच्या वाट्याला येणारी कंटाळवाणी कामे नाहीशी करण्यासाठी केला पाहिजे.
(८) स्त्रियांना सर्व क्षेत्रात समान संधी दिली पाहिजे.
(९) स्त्रियांची 'गुलाम' म्हणून प्रतिमा निर्माण करण्याचे प्रयत्न संपवले पाहिजेत.

स्वयं अध्ययासाठी प्रश्न

(च) आर्थिक स्वातंत्र्याबरोबर स्त्रीला आणखी कोणत्या स्वातंत्र्याची गरज आहे ?

---

---

(छ) खालील 'नामा ' पासून कोणती विशेषणे तयार होतील ? लढा, क्रान्ती, समूह, समुदाय, तंत्र, उत्पादन बेगड, उद्योग

---

---

(ज) खालील शब्दांची अनेकवचनी रूपे लिहा

साखळी ........ भाकरी ........
नवरा ........ पाऊल ........
लढा ........ मोर्चा ........

(झ) एका वाक्यात उत्तरे द्या

१) हुंडा का घेतला जातो ?
२) स्त्रियांची कुचंबणा का होते ?
३) स्त्रियांच्या मार्गातील मोठा अडसर कोणता ?
४) संघटनेमुळे स्त्रियांना कोणता लाभ होईल ?

(ग) खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करा.

श्रमशक्ती.

---

पुढाकार घेणे.

---

बढती.

---

निदर्शने करणे

---

## ४.४ नमुना उत्तरे

(क) १ आपले घटनाप्राप्त हक्क उपभोगण्यासाठी.
   २ शोषणाविरूध्द लढण्यासाठी.
   ३ अत्याचाराविरूध्द लढण्यासाठी.
   ४ काम मिळवण्यासाठी.
   ५ समान वेतन, समान सवलती, समान संधी मिळवण्यासाठी.

(ख) भांडवलदार स्त्रीची श्रमशक्ती विकत घेतो. तिला न्याय्य वेतन न देता मिळणारा नफा स्वतःच्या खिशात घालतो.

(ग) एकजूट हीच स्त्रीची शक्ती. नफा म्हणजेच कामगाराचे शोषण केलेले श्रम. समाजवादी क्रान्तीशिवाय स्त्री मुक्त होणार नाही. स्त्रियांना लढयातून शिक्षण मिळते व शक्तीची जाणीव होते.

(घ) दीर्घकाल संप, बैठा संप, लाक्षणिक उपोषण, वाटाघाटी, मोर्चा, घेराव, धरणे, सामुदायिक रजा, आमरण उपोषण.

(ङ) परिचारिका, डॉक्टरीण, केन्द्र संचालिका, वकीलीण, प्राध्यापिका, नटी, नर्तिका, इ.

(च) सांस्कृतिक व मानसिक स्वातंत्र्य.

(छ) लढाऊ, क्रान्तिकारक, सामूहिक, सामुदायिक, तांत्रिक, उत्पादक, बेगडी, औद्योगिक.

(ज) साखळया, नवरे, लढे, भाकऱ्या, पावले, मोर्चे.

(झ) (१) समाजात पैसा व प्रतिष्ठा याला महत्त्व आहे.
   (२) अज्ञान, परावलंबन यामुळे कुचंबणा होते.
   (३) भांडवलशाही समाजव्यवस्था.
   (४) आपले प्रश्न व अडचणी सोडवता येतील.

(ग) १ श्रमशक्तीशिवाय शोषण नाहीसे होणार नाही.
   २ आपले प्रश्न सोडवण्यासाठी स्त्रियांनीच पुढाकार घ्यावा.
   ३ भाकऱ्या भाजण्याचे काम पुरूषांनीही करावे.
   ४ घराची काळजी असली की बढतीची संधी हातची जाते.
   ५ मागण्यासाठी निदर्शने करावी लागतात.

## ४.५ अधिक अध्ययन

### ४.५.१ वेपक विचार

स्त्रियांनी आपले अनुभव, आपले म्हणणे मांडावयास सुरूवात केली आहे. त्यातले वेचक विचार.

(१) समानता याचा अर्थ एकसारखेपणा असा नाही. संधीची समानता व निवडीचे स्वातंत्र्य हाच त्याचा अर्थ.

(२) स्त्री ही केवळ मादी नसून, बाहुली नसून तिलाही स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. तिला केवळ शरीर नसून संवेदनक्षम मन आहे हा विचार जो पर्यंत पुरुषप्रधान संस्कृतीत मूळ धरणार नाही तो पर्यंत तिची वेदना, तिचे दुःख चिरंतन राहणार आणि जेव्हा पुरुषांची प्रवृत्ती बदलेल तेव्हाच वेदनेचा वेद होईल.

(३) लग्न हा सौदा किंवा बाजार नव्हे.

(४) स्त्री अर्थार्जन करते म्हणून तिला आर्थिक स्वातंत्र्य लाभते असे नाही.

### ४.५.२ लेखिका परिचय

श्रीमती छाया दातार या स्त्रियांच्या प्रश्नात नुसता रस घेत नाहीत तर त्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी संघटनात्मक कार्य करतात. त्यांच्या लेखनाच्या मागे त्यांचा कार्यानुभव आहे म्हणून त्यांच्या विचाराला मोल आहे. भारतातील - विशेषतः स्त्रीमुक्तीची चळवळ अलीकडे हळू हळू मूळ धरू लागली आहे. त्यातील एक लढाऊ कार्य कर्त्या.

## ४.६ सारांश

स्त्रीकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलत चालला आहे. भारतीय राज्यघटनेत स्त्री–पुरुषांना समान हक्क आहेत. स्त्रीच्या विकासाला दाही दिशा मोकळ्या आहेत. स्त्रीला माणूस म्हणून प्रतिष्ठेने जगता यावे साठी स्त्रीमुक्ती चळवळीला आरंभ झाला. भारतात ती मूळ धरू लागली आहे. पण समाजवादी समाज व्यवस्थेत स्त्री–मुक्तीची चळवळ जोमाने विकसित होईल.

सर्व स्तरांतील स्त्रियांची एकजूट व्हायला हवी नजर एकजूट होईल, स्त्रियांच्यासाठी झगडणाऱ्या संघटना बळकट होतील तर स्त्रियांचे प्रश्न सोडवता येतील. कामगार स्त्रिया शोषणा विरूद्ध लढू लागल्या आहेत. शेतमजुरांच्या स्त्रियाही जागृत झाल्या आहेत. पांढरपेशा मध्यमवर्गीय स्त्रियांनाही एकजूट करावीच लागेल.

आर्थिक स्वातंत्र्य ही स्त्रीची पहिली गरज. पण त्याचबरोबर स्त्रीला सांस्कृतिक व मानसिक गुलामगिरीतून मुक्त होता आले पाहिजे.

समाजवादी समाजव्यवस्थेच्या स्थापनेसाठी सर्व स्तरांतील स्त्रियांना लढावेच लागेल.

## ४.७ सरावासाठो स्वाध्याय

:१ स्त्रियांसाठी कारखान्यात पाळणाघराची सोय हवी आहे. संचालकांना मागणी करणारे पत्र लिहा.

:२ स्त्रियांना कौटुंबिक कामाचा मोबदला मिळाला पाहिजे असा आशय मांडणारा निबंध लिहा.

:३ दूरदर्शनवर स्त्रीची प्रतिमा स्त्रीवर अन्याय करणारी आहे तिच्याविरूध्द लढा उभा करावयाचा आहे. कोणत्या घोषणा द्याल त्या लिहा.

:४ 'सतीबंदी' वर एक परिच्छेद लिहा.

## ४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके.

१) मी बाई आहे म्हणून - संपा. विद्युत भागवत, भारतीय अर्थविज्ञान वर्धनी, पुणे